# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.01.2025 वार- बुधवार**

---

**जीबीएस-केंद्रीय-पथक**

पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या वाढल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं नेमलेल्या उच्चस्तरीय पथकानं आज पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. जीबीएसची रुग्णसंख्या आणि त्यांच्यावरील उपचारांची माहिती महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी पथकाला दिली. सहसंचालिका डॉक्टर बबिता कमलापूरकर यांच्याशीही त्यांनी चर्चा केली. तसंच, ससून सर्वोपचार रुग्णालयाला भेट देऊन रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांसोबत बैठक घेतली. केंद्रीय पथकानं आज सिंहगड रस्ता परिसरातील पाण्याचा स्त्रोतांची पाहणी केली. या पथकानं रुग्णसंख्या वाढण्याच्या नेमक्या कारणांचा शोध सुरू केला आहे.

**जीबीएस-सर्वेक्षण**

पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून ‘जीबीएस’ बाधित भागांमध्ये तातडीनं रुग्ण सर्वेक्षण सुरू करण्यात आलं आहे. ‘जीबीएस’ची लक्षणं दिसून येणाऱ्या रुग्णांचा शोध आरोग्य विभागाची पथकं घेत आहेत. रुग्ण आढळून आलेल्या परिसरात आरोग्य विभागाकडून 45 हजार 52 घरांचं सर्वेक्षण करण्यात आलं आहे. महापालिका आणि आरोग्य विभागानं यासाठी 86 पथकं तैनात केली आहेत. जीबीएसच्या रुग्णांची माहिती एकत्र करण्यासाठी तसंच रुग्णांना महापालिकेच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या योजनेचा फायदा घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शहरातील रुग्णालयांसाठी आरोग्य विभागानं मध्यवर्ती अधिकाऱ्यांची नियुक्त केली आहे. तसंच, बाधित गावांमध्ये मेडीक्लोरच्या बाटल्यांचं वाटप महापालिकेकडून करण्यास सुरुवात केली आहे.

**जीबीएस**

जीबीएस या आजाराचं निदान करण्यासाठी ‘एनसीव्ही’ चाचणी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आणि नवीन थेरगाव रुग्णालयात मोफत केली जाणार आहे.

जीबीएस आजाराचे 15 संशयित रुग्ण पिंपरी, वाकड, भोसरी, पिंपळेगुरव, चिखली, तळवडे या भागात आढळले आहेत. शहरातील खासगी रुग्णालयांकडे ‘इम्युनोग्लोब्यूलिन’ इंजेक्शन नसल्यास त्यांनी जीबीएसच्या रुग्णांना दाखल न करता महापालिकेच्या रुग्णालयात पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत. आठ रुग्णालय विभागाअंतर्गत प्रत्येकी दोन अशा 16 पथकांमार्फत घरांची तपासणी केली जात असल्याचं आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोफणे यांनी सांगितलं.

**<u>पिंपरीचिंचवड</u>**

जीबीएसच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याबाबत काटेकोर सूचना महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागानं नागरिकांना दिल्या आहेत. सर्व गृहनिर्माण संस्थांनी आपल्या सोसायटीच्या पाण्याच्या टाक्या नियमीतपणे स्वच्छ कराव्यात. कूपनलिका आणि विहिरीच्या पाण्याचे नमुने तपासणी करून मगच ते पाणी वापरावं. टॅंकर पुरवठा धारकाकडून टॅंकर भरण्याच्या ठिकाणाबाबत सोसायटीला माहिती असणं आवश्यक आहे आणि तिथल्या पाण्याची गुणवत्ता तपासून घ्यावी, नंतरच त्या पाण्याचा वापर करावा. पाण्याच्या टाकीत पिण्याचं पाणी आणि टॅंकरचं पाणी एकत्रित करू नये. 20 लिटर जारमधील पाण्याच्या गुणवत्तेची खात्री करूनच ते वापरावं आणि सद्यस्थितीत पिण्याचं पाणी उकळून आणि गाळून प्यावं अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**<u>पाणी</u>**

पुणे शहरात सिंहगड रस्ता परिसरातील किरकटवाडी, नांदेड सिटी, धायरी, आंबेगाव परिसरात गुलेन बॅरी सिंड्रोम या आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतील पाणी प्रदूषित असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. त्यामुळं विहिरीच्या पाण्यात क्लोरिन टाकणं आणि क्लोरिनचं प्रमाण मोजण्यासाठी आता स्वयंचलित मीटर यंत्रणा बसविण्यात येणार आहे. पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी ही माहिती दिली.

**<u>संगणक</u>**

पुणे महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या 32 गावांतील संगणक प्रणाली अद्ययावत केली जाणार असल्यामुळं प्रशासकीय कामकाजात गतिमानता येणार आहे. हे काम खाजगी कंपनीला देखभाल आणि दुरुस्तीसह पाच वर्षांसाठी दिलं आहे. त्यासाठी 6 कोटी 40 लाख रुपये खर्चाला स्थायी समितीनं मान्यता दिली आहे.

**<u>बुद्धिबळ</u>**

पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेनं खुल्या राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धेत पुण्याच्या अविरत चौहाननं अजिंक्यपद पटकावलं. केवल निर्गुण आणि सौरभ म्हामणे अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर राहिले. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून गेहना शिंगवी आणि समृद्धी मकतेदर तर सर्वोत्कृष्ट प्रौढ खेळाडू म्हणून चंद्रकांत डोंगरे आणि लहुचंद ठाकूर यांना गौरविण्यात आलं.

**अडथळे**

धनंजय दामले स्मृती आंतर-शालेय आणि आंतर-महाविद्यालय 'ऑप्टी रेस' अडथळा सांघिक स्पर्धा सुरू आहेत. या क्रीडा प्रकारात महाराष्ट्रीय मंडळ इंग्लिश मिडीयम स्कूल, इंद्रायणी इंटरनॅशनल स्कूल आणि आर्मी पब्लिक स्कूल संघांनी कमी वेळ नोंदवित आगेकूच करून उद्घाटनाचा दिवस गाजवला.

---

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**